**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ चा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री एस.आर कुलकर्णी यांचे मार्फत सुरुः–**

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,

माझे नावः – माधाप्पा गौडाप्पा हनमावाले,

वय – ५५ वर्षे, व्यवसाय–शेती,

राहणार – रा.तांबाळा , ता.निलंगा, जि. लातूर

दि.२४/०८/२०१८ रोजी पोलीसांसोबत मी कुठेही गेलो नव्हतो. पोलीसांनी माझ्या समक्ष काय कारवाई केली मला माहीत नाही. पोलीसांनी माझी सही मंदीरासमोर घेतली. मी माझी सही ओळखु शकतो. साक्षीदारास आता पंचनामा दाखवण्यात आला. त्यावर अनुक्रमांक १ ला माझी सही आहे. परंतु पंचनाम्यातील मजकुर मला माहीती नाही. त्यामुळे सहीस ओळखीपुरता **नि.क्र.४४** देण्यात येतो. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्या समक्ष घटनास्थळाचा पंचनामा केला.

साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्याकारणाने अभियोग पक्षातर्फे भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागणेत आली**.** वस्तुस्थितीची पाहणी करता व साक्षीदाराचे विसंगत विधान बघता सदर परवानगी देणेत आली**.**

०२. हे म्हणणे खरे नाही की, दि.२४/०८/२०१८ रोजी मी पोलीसांसोबत तांबाळा शिवरातील शेत सर्वे नंबर २०४ मध्ये गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळातील पंचनाम्याप्रमाणे माझ्या समोर पंचनामा केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, पंचनामा मला

वाचून दाखवला व मी त्यावर सहया केल्या. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण**

**उलटतपास आरोपी तर्फे अॅड. जी.एस.दातार यांनी नाकारला –**

**फेरतपास नाही.** **श्रवणोत्तर स्वीकृत.**

Digitally signed by KOMAL PRAMOD GADE
Date: 2025.07.25 16:53:12 +0530

(**श्रीमती.के.पी.गाडे**)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.२,निलंगा

दिनांक–२५/०७/२०२५.